MHRG100011412016

# नियमित दिवाणी दावा क्र. ८१/२०१६
# निशाणी क्र. ८७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी दशरथ सखाराम नांगले यांनी वादी क्र. २ रखमाबाई चंद्रकांत वाडकर हे दिनांक १८/०४/२०२४ रोजी मयत झाल्याने त्यांचे ६ वारस अभिलेखावर दाखल करून घेण्यासाठी दिला आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ३ तर्फे म्हणणे दाखल करून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत नोंदवली. प्रतिवादी क्र. ३ यांच्या म्हणण्यानुसार, खात्री व कागदोपत्री पुराव्यानिशी वारसांची नावे नोंद करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज हा पुरावे सादर न करता दिला असल्याने तो नामंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. अभिलेखाची पडताळणी केली. युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज हा वादी क्र. २ रखमाबाई चंद्रकांत वाडकर यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल करण्यात आला असुन वादी क्र. २ रखमाबाई चंद्रकांत वाडकर हे दिनांक १८/०४/२०२४ रोजी मयत झाल्याचे कथन करण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक २४/०७/२०२४ रोजी दाखल करण्यात आला असुन त्यातील कारणे योग्य असल्याबाबत युक्तिवाद करण्यात आला. वादी क्र. २ यांना सहा वारस असुन त्यांना दावा चालविण्याचा हक्क प्रथम दर्शनी प्राप्त होत असुन प्रस्तुत दाव्याचे स्वरूप दावा हा डिक्लेरेशनरिता व निरंतरचे ताकीदीकरिता

दाखल असल्याने दाव्याचा गुणदोषांवर निकाल होणेसाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचीत होईल.

# आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादी क्र. २ च्या वारसांना कायद्याच्या निर्धारीत वेळेमध्ये पटलावर घेणेस परवानगी देण्यात येते.
३. खर्चाविषयी आदेश नाही.

*(खुल्या न्यायालयात जाहीर)*

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2025.11.05 17:10:37 +0530

महाड, (यु. एम. जाधव)
दिनांक – ०५/११/२०२५ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, महाड

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. B. T. Deshmukh, |
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav,<br>2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Date of decision / typed | :- | 05/11/2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 05/11/2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 05/11/2025 |